दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २५३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.१३ डिसेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# चेंबुर येथील विद्यार्थ्यांच्या लक्झरीचा बोरघाटात भीषण अपघात

## अंडा पॉईट जवळ लक्झरी बस उलटली ; दोन जण ठार?

**दै.रायगड नगरी । खोपोली**

**बोरघाट मृत्यूचा 'बर्म्युडा ट्रॅगल' बनला असून दररोज अपघात व बळीचा आकडा वाढतच चालला आहे. आज बोरघाटातील मृत्यूच्या सापळ्यात चेंबूर येथील एका खाजगी क्लासच्या विद्यार्थ्यांची लक्झरी बस सापडली. या बसमध्ये ४८ विद्यार्थी होते, त्यापैकी दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत असली तरी याची आरोग्य विभाग व पोलीस प्रशासनाकडून कोणतीच पुष्टी होऊ शकलेली नाही. खोपोली शहर व परिसरात या जखमींना पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करण्यात आली होती, यावेळी अनेक चर्चांना ऊत आला होता. दरम्यान, जखमींना खोपोली येथील रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून गंभीर जखमींना पनवेल एमजीएम रूग्णालयात हलविण्यात आले असल्याचे समजते.**



या अपघाताबाबत सूत्रांकडून मिळाली माहिती अशी की, मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटातील अंडा पॉईट जवळ आज रविवार, दि. ११ डिसेंबर २०२२ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास एक लक्झरी बस पलटी झाली आहे. या बसमध्ये एकूण ४८ विद्यार्थी होते.

चेंबूर येथील एका खाजगी क्लासचे विद्यार्थी लक्झरी (बस क्र. MH 04, GP 2204) बसमधून लोणावळ्यातील वेट ॲन्ड जॉय येथे आले होते. परतीचा प्रवास करताना खंडाळा घाटातील अंडा पॉईट जवळील वळणावर हा अपघात झाला आहे. अपघा–ताची माहिती समजताच बोरघाट व खंडाळा महामार्ग पोलीस, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या सामजिक संस्थेचे कार्यकर्ते व इतर यंत्रणा घटनास्थळी दाखल झाले असून बसमधील जखमी मुलांना रुग्णालयात दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. अपघातामधील जखमींना खोपोली भागातील विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. तसेच गंभीर जखमींना पनवेल एमजीएम रूग्णालयात हलविण्यात आले असल्याचे समजते.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आहे. प्रशासनाकडून सर्व जखमी रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या संकटापासून सर्व विद्यार्थ्यांची सुखरुप सुटका व्हावी यासाठी प्रशासन युद्ध पातळीवर प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत असून त्यांना देवदूत टीम, आयआरबी पेट्रोलिंग, खोपोली पोलीस, बोरघाट वा–हतूक पोलीस, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेचे सदस्य, लोकमान्य आरोग्य सेवा, डेल्टा फोर्स आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवान यांची साथ मिळत असल्याचे दिसून आले.

# ना.चंद्रकांत पाटील यांचा केला विविध संघटनांनी केला निषेध व रास्ता रोको



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल व नवी मुंबई परिसरातील विविध संघटनांनी आज कळंबोली सर्कल महामार्ग क्रमांक चार येथे एकत्रित येऊन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत पाटील यांचा निषेध केला तसेच काही काळासाठी रास्ता रोको केला होता.

या रास्ता रोको आंदोलन माळी विकास मिशनचे प्रमुख सुरेश जाधव तसेच क्रांतीज्योती महिला मंडळ पनवेलचे अध्यक्षा रूपालीताई शिंदे व त्यांच्या महिला सहकारी, कळंबोली येथील संत सावतामाळी मंडळाचे अध्यक्ष उद्धव भुजबळ व त्यांचे सहकारी, कोपरखैरणे येथील सावता माळी मंडळाचे अध्यक्ष करणे तसेच कुंडलिक चौधरी, महाजन आणि कामोठे महिला मंडळ सुरेश जाधव तसेच विविध ठिकाणचे मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांनी नुकतेच पैठण जिल्हा औरंगाबाद येथे महात्मा ज्योतिराव फुले, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बद्दल अपशब्द वापरले त्याचा तीव्र शब्दात निषेध करून भविष्यामध्ये अशा प्रकारचे कोणत्याही महापुरुषाबद्दल किंवा थोर समाजसेवकाबद्दल कोणीही अपशब्द करू नयेत किंवा त्यांचा अपमान करू नये म्हणून कायदा करण्याबाबत शासनाला निवेदन दिले.

शासनाच्या वतीने तहसीलदार पनवेल आणि कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांना निवेदन देण्यात आले.

# मासेमारीच्या विषारी गोळया बाळगून जिवितास धोका ; दोघांविरूध्द गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील नदीपात्रामधील गोडया पाण्यातील मासेमारी करण्यासाठी विषारी गोळयांची विक्री करण्याकरिता स्वत:च्या राहत्या घरामध्ये बाळगून स्वत:च्या आणि फिर्यादीच्या जिवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी पोलादपूर पोलीसांनी दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

पोलादपूर तालुक्यात मासेमारीच्या गोळया निष्काळजीपणे हाताळल्याप्रकरणी अनेकांना जिवानिशी मुकावे लागले आहे. यामुळे या गोळयांच्या विक्रीवर कायद्याने बंदी असताना अनेकजण बेकायदेशीररित्या स्वत:च्या फायद्याकरीता या गोळ्यांची विक्री करीत असल्याची तक्रार बेबी आप्पा सुतार या ७५ वर्षीय महिलेने केल्यावरून पोलादपूर पोलीसांनी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास गाडीतळ पोलादपूर येथील फिर्यादीच्या घरातून आकाश बाबू सुतार (वय २२ वर्षे ) आणि राजेश रवींद्र जांभळेकर (वय ४० वर्षे) यांच्याकडून २५० ग्रॅम वजनाच्या अंदाजे २०० रूपये किंमतीच्या सफेद रंगाच्या मासे मारण्याच्या विषारी गोळया हस्तगत केल्या आणि दोन्ही आरोपींविरूध्द दखलपात्र गुन्हा र.नं.१२६–२०२२ भा.दं.वि.सं.२८४ कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# स्लॅब कोसळून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल सुकपूर वसाहतीमधील नवजीवन सोसायटीच्या तीन मजली इमारतीचे दोन स्लॅब अंगावर कोसळून एका १२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी रात्री १२ च्या सुमारास घडल्याचे समोर आले आहे.

या तीन मजली इमारतीचे पहिल्या आणि दुसऱ्या माळ्याचे स्लॅब कोसळून ही दुर्घटना घडली आहे. ही घटना घडली त्या वेळी या इमारती मध्ये तीन कुटूंब राहत होते. दैव बलवत्तर म्हणून या कुटूंबाला इजा देखील झाली नाही, मात्र बेडरूम मध्ये बेड वर झोपलेल्या १२ वर्षय शुभम सुरेश राजभर या युवकाचा मृत्यू झाला आहे. ही घटना घडल्या नंतर घटनास्थळी पोचलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोचून बचाव कार्य सुरू केले आणि ढिगारा रिकामा करून शोध कार्य संपवले.

# जेएनपीए येथील पार्किंग बनलेत अमली पदार्थ विक्रीचे अड्डे

## पोलीस यंत्रणेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । उरण**

आशिया खंडातील सर्वात मोठे बंदर असणाऱ्या जे एन पी ए बंदर परिसरात असणाऱ्या अवजड वाहनांच्या पार्किंग सध्या गुन्हेगारी विश्वाच्या आश्रयस्थान बनल्या आहेत. या पार्कींग मध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची विक्री होत असल्याने जे एन पी ए विभाग सध्या अमली पदार्थांचे माहेरघर झाल्याचे दिसून येत आहे.या पार्किंग मध्ये. चरस,गांजा,दारूची खुले आम विक्री होत असताना हाकेच्या अंतरावर असणाऱ्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याची पोलीस यंत्रणा त्याकडे जाणीव दुर्लक्ष करीत असल्याने चरस गांजाच्या खुलेआम विक्रीला पोलीस यंत्रणेचा आशिर्वाद असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

उरणच्या जे एन पी ए बंदराच्या कार्यकक्षेत अजून तीन खाजगी बंदरांची निर्मिती झाल्याने बंदरांतील मालाच्या वाहतुकीसाठी देशाच्या अनेक भागातून हजारो अवजड वाहने जे एन पी ए विभागात येत असतात. या वाहनांमुळे रस्त्यांवर गर्दी होऊ नये म्हणून जे एन पी ए प्रशासनाने या वाहनांसाठी मोठमोठ्या पार्किंग निर्माण केल्या व त्या भाडे तत्वावर दिल्या आहेत.तर काही गावगुंडांनी जे एन पी ए च्या जागांवर अतिक्रमण करून खाजगी पार्किंग सुरू केल्या आहेत.

या पे पार्किंग चालविणाऱ्या काही परप्रांतीय व्यक्तींनी या पार्किंग मध्ये वाहनाच्या भाड्यातून चांगले पैसे मिळत नसल्याने वाहने घेवून येणाऱ्या ड्राइव्हर लोकांसाठी दारू विक्री बरोबरच गांजा,चरस विक्री सुध्दा मोठ्या प्रमाणात सुरू केली असून त्यातून लाखोंचा मलिदा जमविला आहे. जे एन पी ए विभागातील बहुतेक पार्किंग मध्ये असणाऱ्या टपऱ्यांमध्ये हे गोरखधंदे बिनबोभाट सुरू असल्याने जनतेत आश्चर्य व्यक्त होत आहे.न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या लगत असणाऱ्या पार्किंग मध्ये हे धंदे तर बिनधास्त सुरू आहेत. पोलिसांचा आशिर्वाद असणारी एक परप्रांतीय व्यक्ती हे पार्किंग चालवीत असताना पोलिसांना आम्ही पोसीत असल्याने आम्हाला कोणाची भीती नसल्याचे तो नेहमी दर्पोक्ती करीत असतो.त्यामुळे जे एन पी ए विभागातील परिस्थिती बिहार उत्तर प्रदेशच्या वाटेवर असल्याचे दिसून येते.

गेल्या काही वर्षात जे एन पी टी विभागातील रस्ते अपघातात अवजड वाहनांमुळे अनेक अपघात होऊन मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे.त्याला कारण या पार्किंग मध्ये होणाऱ्या दारू गांज्याचे सेवन करून परप्रांतीय वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालविण्यामुळे हे अपघात झाल्याच्या नोंदी आहेत.

आठ दहा वर्षांपूर्वी काही परप्रांतीय वाहनचालकांनी अमली पदार्थांचे सेवन करून या विभागात मोठा राडा केला होता.त्यात अनेक पोलीस कर्मचारी जखमी होऊन या परप्रांतीय वाहन चालकांनी पोलीसांचे वाहन सुद्धा पटवून देऊन दंगल माजविण्याचा प्रयत्न केला होता .

हा इतिहास जवळ असतानाही आज मितीस जे एन पी ए विभागांतील अशा वाहनतळांवर अजूनही अनेक मादक द्रव्यांची राजरोस विक्री व परप्रांतीय गुंडगिरीचा त्रास स्थानिक जनतेला होत असताना पोलीस यंत्रणा त्यांना संरक्षण देत असेल तर हे गंभिर असल्याने अशा पार्किंग चालकांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांचा नागोठण्यात जाहिर निषेध



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

महात्मा जोतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांबाबत भारतीय जनता पार्टीचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांनी आक्षेपार्ह व अपमानकारक वक्तव्ये केल्यामुळे तमाम बहुजन समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे रविवारी(दि.११) सायंकाळी नागोठणे येथील बहुजन समाज बांधव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बहुसंख्येने एकवटले. त्यानंतर त्यांनी ना. चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात घोषणा देऊन त्यांचा जाहीर निषेध केला.

दरम्यान अशा वाचाळ वीरांना व त्यांच्या गलिच्छ वर्तनाला शासनाकडून कायमची खीळ बसावी व अशा विकृत प्रवृत्तींना पायबंद करावा असे निवेदनात नमूद करुन महापुरुषांची बदनामी करीत सामाजिक भावना दुखावल्याबद्दल ना. चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करा असे निवेदन बहुजन समाजाच्या वतीने पोलिस उपनिरीक्षक नारायण चव्हाण व सहा. पोलिस उपनिरीक्षक जनार्दन म्हात्रे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जेष्ठ रिपब्लिकन नेते व्ही. के.जाधव, चंद्रकांत गायकवाड, एस. एन. गायकवाड, आर. पी.आय रोहा तालुका अध्यक्ष संतोष गायकवाड, सुनिल लाड, भगवान बिनेदार, प्रभाकर ओव्ह–ळ, शाहिर अशोक भंडारे, ॲड.प्रकाश कांबळे, विकास जाधव, विलास कांबळे, काशिनाथ दाभाडे, सहदेव खंडारे, दिलीप गायकवाड, बबन झेंडे, किसन शिर्के, अल्पेश शेलार, अरविंद गायकवाड, प्रशिक बिनेदार, अल्पेश शेलार, सुरेश कांबळे, गणेश कांबळे, रामदास लोखंडे, अशोक गायकवाड आदींसह बहुजन समाज बांधव यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील आदेशाची पायमल्ली होत असल्याने शेतकऱ्यांचे उपोषण

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायतील खाड्याचा पाडा येथे एका विकासकाने तेथील शेतकऱ्यांच्या जागेत कोणत्याही परवानगी विना बांधकाम सुरू केले आहे. त्याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे तक्रार केली होती. त्याबाबत चर्चा होऊन बांधकाम थांबवण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाचा आदेश बासनात गुंडाळून विकासक राजरोस बांधकाम करीत आहे. त्याविरोधात शेतकऱ्यांनी प्राणांतिक उपोषण सुरू केले आहे.



खाड्याचा पाडा येथे एक्झार्बिया डेव्हलपर्स ही पुण्याची कंपनी गृहप्रकल्पाचे काम करीत आहे. हे काम करताना त्यांनी खरेदी केलेली जमीन सोडून अन्य शेतकऱ्यांच्या जमिनीवर कोणाचीही परवानगी न घेता काम सुरू केले आहे. याबाबत असे निदर्शनात आले आहे की. २००६ साली मयत झालेल्या एका शेतकऱ्याची सही २०१२ साली केलेल्या मोजणीच्या पत्रकावर सही घेतली आहे. असे प्रकार झाले झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे तक्रार करून न्याय मागितला होता. त्यानुसार २७ ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी सदरच्या बांधकामाला स्थगिती द्यावी असा निर्णय देण्यात आला. त्या आदेशाचेलेखी पत्र एक्झार्बिया डेव्हलपर्सचे अधिकृत प्रतिनिधी इशांत फालके यांना देण्यात आले. त्यांनी तो आदेश बास–नात गुंडाळून राजरोस काम सुरू ठेवले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील आदेशाची पायमल्ली होत आहे.

याबाबत संबंधित शेतकरी गोविंद मालू डायरे, अण्णा कृष्णा खाडे, सतीश बुधाजी डायरे, चंद्रकांत मालू डायरे यांनी आदेशाची अंमलबजावणी करावी. यासाठी निवेदन दिले होते आणि न्याय न मिळाल्यास उपोषण करण्याचा इशारा दिला होता. पंधरा दिवस झाले तरी न्याय न मिळाल्याने संबंधित शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली आहे.

# पाली शहरात धुळीच्या साम्राज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली शहरात सर्वत्र धुळीचे लोट वाहत आहेत. त्यामुळे पाली शहराची ओळख धुळीचे शहर म्हणून होत आहे .या धुळीकडे नगर पंचायत मुख्य कार्यकारी अधिका–यांचे दुर्लक्ष होत असल्याने नागरीकातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शहरात प्रदूषित हवेमुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. प्रदूषणामुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्येने श्वसनक्रियेत अडचणी निर्माण होत आहेत. प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार, ऍलर्जी, खोकला, कफ, धाप, सर्दी, घशात दुखणे अशा त्रासास सामोरे जात आहेत. या धुलीकणाचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसन क्षमता कमी होत आहे. प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. हवेतील धुळीचे प्रमाण सरासरीपेक्षा वाढल्याने नागरिकांना श्वसन विकारांना सामोरे जावे लागत आहे.शहरातील खराब रस्ते, शहरात कासवाच्या गतीने सुरू असले रस्ता बांधकाम, शहरातून ओव्हरलोड वाहतूकीवर पोलिस अधिकारी, नगरपंचायत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे शहरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असल्याचा आरोप नागरीकातून होत आहे. त्यामुळे नागरिकाचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबद्दल नागरीकातून तीव्र नाराजीचा सूर व्यक्त होत आहे.



# दोन विजय; दोन अर्थ

साऱ्या देशाचे लक्ष लागून असलेल्या तीन निवडणुकांचे निकाल गेल्या दोन दिवसांत लागले आहेत. यातला गुजरातमध्ये झालेला भारतीय जनता पक्षाचा विजय विक्रमी आणि ऐतिहासिक आहे. हिमाचल प्रदेशात झालेला काँग्रेसचा विजय पक्षाचा हुरूप वाढविणारा आहे आणि दिल्ली महानगर पालिकेतील आम आदमी पक्षाचा विजय राजधानीतील पक्षाचे स्थान बळकट करणारा आहे. गुजरातमध्ये भाजपची राजवट १९९५ पासून चालू आहे आणि या २७ वर्षांतील १२ वर्षे नरेंद्र मोदी या राज्याचे मुख्यमंत्री होते. तिथूनच ते पंतप्रधानपदी गेल्यामुळे गुजरातमधील निवडणूक ही स्वत: मोदी आणि पक्षासाठीही अनन्य महत्त्वाची असल्यास नवल नाही. गुजरातमधील जातीय दंगलींनंतर मोठ्या प्रमाणात ध्रुवीकरण झालेले असताना तेव्हा मुख्यमंत्री या नात्याने मोदी यांनी गुजरातमध्ये मुदतपूर्व निवडणूक घेतली होती. तेव्हाही इतके मोठे यश मिळाले नव्हते. अलीकडे, देशात सतत निवडणुकांचे वातावरण असते आणि त्यामुळे तापमानही वाढत राहते. आता सन २०२३ मध्ये अनेक राज्यांच्या निवडणुका आहेत आणि त्याच्या पुढच्या वर्षी म्हणजे २०२४ मध्ये तर सार्वत्रिक निवडणुकाच आहेत. त्यामुळे, गुजरात आणि हिमाचल ही राज्ये छोटी असली तरी तेथील मतदारांचा कौल महत्त्वाचा होता. त्यामुळेच, देशभरात अनेक ठिकाणी पीछेहाट होत असलेल्या काँग्रेस पक्षाने हिमाचलमधील सत्ता भाजपकडून खेचून घेण्याला महत्त्व आहे. काँग्रेसच्या ठिकठिकाणच्या प्रदेश शाखा मनात आणले आणि ठरविले तर लढत देऊ शकतात आणि विजयही मिळवू शकतात, याची खात्री पटविणारा हिमाचल प्रदेशातील विजय आहे. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने तीन दशकांहून अधिक काळ सलग राज्य केले. त्यातील बहुसंख्य काळ ज्योती बसू यांच्या मुख्यमंत्रिपदाचा होता. गुजरातच्या या नव्या विधानसभेचा कार्यकाळ पुरा होईल, तेव्हा या विक्रमाची बरोबरी होईल. गुजरातमधील भाजपचा विजय हा एका अर्थाने दिल्लीतील भाजपच्या आणि मोदींच्या स्थानाशी जोडलेला आहे. त्यामुळेच, विरोधकांनी कितीही टीका केली तरी पंतप्रधान मोदी यांनी स्वत: तेथे तीसहून जास्त सभा घेतल्या. त्याचे भरभरून फळ मतदारांनी भाजपला दिले आहे. एखाद्या राज्यात एखाद्या पक्षावर याहून मतदारांनी किती प्रेम करायचे आणि विश्वास टाकायचा? आम आदमी पक्षाला गुजरातमध्ये मिळालेल्या मतांच्या टक्केवारीमुळे देशातील आठवा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळणार असली तरी पक्षाची कामगिरी मुळीच समाधानकारक नाही. भारतीय जनता पक्षाला एक नवा राष्ट्रव्यापी पर्याय निर्माण करण्याच्या कल्पनेने जे भारले आहेत; ते सातत्याने आम आदमी पक्षाकडे मोठ्या अपेक्षेने पाहात असतात. मात्र, दिल्ली आणि पंजाब यांचा अपवाद वगळता गेल्या दशकभरात 'आप'ने असा कोणता मोठा पराक्रम केला आहे? त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, या पक्षाची विचारसरणी, ध्येयधोरणे, कार्यक्रम काय आहेत? केवळ मतदारांना 'फुकटेगिरी'ची सवय लावणे किंवा तशी आश्वासने देणे म्हणजे राष्ट्रीय पक्ष चालविणे नव्हे. आम आदमी पक्ष स्वत: जिंकत नसला तरी जागोजागी काँग्रेसचे नुकसान करीत आहे. गुजरातमध्येही काँग्रेसची जी धूळदाण झाली आहे; तिच्यात 'आप'चा मोठा वाटा आहे. थोड्या फार प्रमाणात गोव्यातही असेच झाले होते. सुदैवाने, हिमाचल प्रदेशात आप काँग्रेसचे इतके नुकसान करू शकला नाही. तेथे अत्यंत चुरशीच्या लढती झाल्या असल्या तरी अखेर काँग्रेसने मिळविलेला विजय लक्षणीय आहे. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे हे राज्य. अनुराग ठाकूर हे तेथील केंद्रीय मंत्री नेत्यांचे आवडते. असे असूनही भाजपला हिमाचलमध्ये विजय मिळविता आलेला नाही. या विजयाचा योग्य तो संदेश काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांनी घेण्याची आवश्यकता आहे. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो यात्रे'ने जे वातावरण देशात निर्माण केले आहे; त्याचा योग्य तो वापर करून काँग्रेसने देशव्यापी विरोधी पक्ष म्हणून उभे राहायला हवे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता कोणत्याही राज्यातील विजयानंतर राजधानीतच मेळावा घेण्याची प्रथा सुरू केली आहे. गुरुवारी रात्री भाजपच्या मुख्यालयासमोर बोलताना त्यांनी भाजपची भूमिका आणि केंद्र सरकार यांचे काम यांचा एकत्रितच उल्लेख केला. केंद्रात भाजप सत्तेत असल्यामुळे गेल्या आठ वर्षांत प्रगती झाली आहे; हे मोदी यांचे वक्तव्य हे एका अर्थाने पुढच्या वर्षी येत असलेल्या अनेक विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराचे रणशिंगच होते. 'देश प्रथम'चा भारतीय राष्ट्रवादाचा जो आग्रही स्वर मोदींनी यावेळी लावला; त्यातही या राष्ट्रवादाचा रक्षणकर्ता भाजप आहे, हे अनुस्यूत होते. भाजपच्या गुजरातमधील विक्रमी यशाचा काँग्रेससहित इतर महत्त्वाचे विरोधी पक्ष कसा अर्थ लावतात आणि काही एकत्रित रणनीती आखतात का; यावर देशाची पुढची राजकीय वाटचाल अवलंबून आहे. 'भाजप'ला देशभरातील महिला मतदार इतके मतदान का करतात, याचे (इतरांनी) आत्मचिंतन करायला हवे, असेही मोदी म्हणाले. हा सल्ला मात्र विरोधकांनी मनावर घ्यायला हरकत नाही.

# कळंबोलीत शरद पवार यांच्या दीर्घायुष्यासाठी रुद्राभिषेक व होम हवन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



हिंदू धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे पूर्वीच्या काळी दीर्घायुष्यासाठी व आजार, व्याधींवर मात करण्यासाठी होम हवन करण्याची प्रथा होती. होमहवनामुळे सकारात्मक लहरी निर्माण होत असतात. ज्याठिकाणी औषधोपचार एका विशिष्ट मर्यादेपर्यंत येऊन थांबतात, त्याठिकाणी होमहवन, रुद्राभिषेक व दैवी शक्ती या माध्यमातून आजारांवर मात करता येऊ शकते अशी आमची भावना आहे. शरद पवार हे सध्या एक मोठ्या आजाराशी झुंज देत आहेत. मागील महिन्यातही त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. त्यामुळे शरद पवार यांना उदंड आयुष्य लाभावे व त्यांची प्रकृती उत्तम राहावी या भावनेतून सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्यावतीने रुद्राभिषेकाचे आयोजन करण्यात आल्याची भावना राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त आज त्यांच्या दीर्घायुष्यासाठी कळंबोली से.१४ येथील श्री शिव व शनी मंदिरात रुद्राभिषेक व होम हवनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी सुदाम पाटील बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव सूरदास गोवारी, जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, माजी जि.प. सदस्य महादेव पाटील, संदीप म्हात्रे, नारायण खरजे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश राजवन, आर एन यादव, राजकुमार पाटील, मजदूर सेल जिल्हाध्यक्ष संतोष शेट्टी, महिला कार्याध्यक्षा शशिकला सिंग, अनुराधा रंगारी, युवती जिल्हाध्यक्षा प्रज्ञा चव्हाण, प्रतिमा जाधव, चंद्रकांत नवले, बळीराम नेटके, मंगेश नेरुळकर, शाबाज पटेल रंजीत नरुटे, स्वाती रौंदळ, रेणुका पगारे, अस्मिता पाटील, सुदेशना रायते, जयश्री खटकाले, राजू भाई मुलानी, शीला घोरपडे, सुनीता माळी, राजश्री कदम, संगीता पवार, जयश्री देसाई, आरती पोतदार, दीपाली ढोले, मीना विश्वकर्मा, महेश पाटील, भागवत पाटील, हराळे महाराज, बळवंत पवार, बबन पवार, नितीन म्हात्रे, नागेश पवार, विलास माघाडे, अरुण ठाकूर, रमेश राव, अर्जुन गायकवाड यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव सूरदास गोवारी म्हणाले, शरद पवार हे आपल्या देशाचे नेते आहेत. आमच्यासारख्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात त्यांच्या कार्यपद्धतीविषयी आदराची भावना आहे. या वयातही त्यांचा काम करण्याचा उत्साह व जोश एखाद्या तरुणालाही लाजवेल असा आहे. या धर्तीवर त्यांच्या दीर्घायुष्यासाठी कळंबोलीत सुदाम पाटील यांच्या माध्यमातून आयोजित रुद्राभिषेक यज्ञाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला याचे समाधान वाटते. शरद पवार यांना परमेश्वराने निरोगी व उदंड आयुष्य देवो ही सदिच्छा व्यक्त करतो. राष्ट्रवादीचे नेते राजकुमार पाटील म्हणाले, शरद पवार हे राजकीय क्षेत्रातील कणखर व प्रबळ इच्छाशक्ती असणारे सह्याद्री पर्वताप्रमाणे विशाल नेतृत्व आहेत. आजपर्यंतची त्यांची कारकीर्द सर्वसामान्यांना प्रभावित करते. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांना दीर्घायुष्य लाभावे या भावनेतून रुद्राभिषेक व होम हवनाचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमाला उदंड प्रतिसाद लाभला. शरद पवार यांना दीर्घायुष्य लाभावे अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो.

# आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सिकलसेल सप्ताह

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य अभियान सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुक्यातील आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात दि. ११ ते १७ डिसेंबर २०२२ या कालावधीत सिकलसेल सप्ताह साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत दिनांक १२ डिसेंबर २०२२ रोजी आरोग्यवर्धनी केंद्र राजपुरी येथे सिकलसेल आजाराबाबत मार्गदर्शनपर माहिती देण्यात आली. यामध्ये सिकलसेल आजार म्हणजे काय सर्वसाधारण व्यक्तींच्या शरीरातील लाल रक्त पेशींचा आकार गोल असतो. पण सिकलसेल. आजारामध्ये या पेशींचा आकार ऑक्सिजन मिळाला नाही तर विळ्यासारखा होतो. इंग्रजी भाषेत सिकल म्हणजे विळा व सेल म्हणजे पेशी म्हणून हा आजाराला सिकलसेल आजार असे म्हणतात.

(२) सिकलसेल आजाराचे दोन प्रकार :- १) पिडीत व्यक्ती (सफरर) : पिडीत व्यक्तीला वारंवार जंतुसंसर्ग होते २) वाहक व्यक्ती (कॅरियर) : ज्या व्यक्तीला सिकलसेल आजाराचा त्रास कमी प्रमाण होतो. पण ती पुढच्या पिढीला सिकलसेल आजार देऊ शकते. (३) सिकलसेल आजाराची लक्षण :- रक्तक्षय, अशक्तपणा, सांधेदुखी, हातापायावर सूज येणे, शरीर पिवळे पडणे, पक्षघात, पित्ताशय, न भरून येणाऱ्या जखमा, डोळ्यांवर परीणाम होणे, प्लीहा आकार वाढ होणे, असह्य वेदना, जंतूसंसर्ग, शारीरीक त्रास, मानसिक त्रास. ४) सिकलसेल सोल्युबिलीटी टेस्ट प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उपकेंद्र वर तपासणी केली जाते, (६) सिकलसेल आजार उपचार:-फॉलिक ॲसिडच्या गोळ्या नियमित घेणे यामुळे लाल पेशीची निर्मिती वाढ होते , भरपूर पाणी पिणे, दररोज ८ ते १० ग्लास नियमित तपासणी , अतिपरीश्रम काम करू नये, विश्रांती घेणे, आहार मासे, अंडी, संत्री, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये, शेंगा, झिंक असलेले पदार्थखाणे आवश्यक आहे,टिबायोटिक्स व हायड्रॉक्सीयुरिया गोळया डॉक्टरांच्या सल्याने घेणे.

याबाबत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सौरभ घरडे व वैद्यकीय अधिकारी डॉ. विकासनी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. जास्मीन धनसे, तालुका सिकलसेल सहा,शालिकराव पावरा, डॉ. जास्मीन धनसे व शालीकराव पावरा यांनी माहिती दिली.आरोग्य सहाय्यिक चव्हाण सिस्टर ,आरोग्य सेविका रुपाली बळी व आशावर्कर तसेच मदतनिस यावेळी उपस्थित होते.



# जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत कर्जतच्या स्पर्धकांचे सुयश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने कर्जत तालुका बुद्धिबळ संघटनेने माजी जगज्ञेता खेळाडू विश्वनाथन यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित केलेल्या १३ व १७ वर्षां आतील जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये १३ वर्षांच्या आतील मुलांच्या अथर्व वाघ ( अलिबाग ) गटात प्रथम क्रमांक तर मुलींमध्ये कर्जतच्या ज्ञानदा गुजराथी ( कर्जत ) हिने आणि १७ वर्षांखालील मुलांच्या गटामध्ये नेरळ - कर्जतच्या शंतनू राऊत ( नेरळ - कर्जत ) तर मुलींच्या गटात श्वेता चौरे ( कर्जत ) हिने अजिंक्यपद पटकावले.



कर्जत शहरातील हनुमान मंदिराच्या सभागृहामध्ये जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास म्हात्रे आणि तालुकाध्यक्ष संजीव ठाकरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी सचिव अंकित जोशी, डॉ. प्रथमेश अळसुंदेकर आदी उपस्थित होते. दोन्ही गटात अलिबाग, खालापूर, पनवेल, कर्जत आदी तालुक्यातील एकूण ९४ स्पर्धक सहभागी झाले होते. सार्थक मिंडे, कपिल कोलंबकर, यश हूंगुंड यांनी पंच म्हणून कामगिरी केली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. अनिरुद्ध जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी आपल्या मनोगतात विलास म्हात्रे यांनी, 'बुद्धिबळ खेळणारी मुले अभ्यासातही हुशार असतात असे अनेक चाचण्यांच्या निष्कर्षा नंतर सिद्ध झाले आहे. त्यामुळे या खेळामध्ये अनेक पालकांनी आपल्या मुलांना सहभागी करावे.' असे आवाहन केले. प्रताप गीते यांनीही आपला बुद्धिबळाचा अनुभव कथन केला.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही १) दशरथ वाळकू पाटील व २) सुरेश वाळकू पाटील रा.चिंचवली, पो.मोर्बे, ता.पनवेल यांचे नावे ताबेकब्जात व वहिटीत असून सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशिल १) दर्शन वसंत पाटील २) सर्वेश वसंत पाटील रा.आकुर्ली, पो.नवीन पनवेल, ता.पनवेल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गट/भूमापन नं. | हिस्सा नं. | भू-धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ५३ | | भोग वर्ग-१ | १-६८-०<br>०-२८-१० (पो.ख.)<br>एकूण क्षेत्र ०-१-९६-५० | २०.४८ |
| वरील सातबारावरील १) दशरथ वाळकू पाटील व २) सुरेश वाळकू पाटील यांच्या ०-३०-०० गुंठे जमीन विक्रीचा व्यवहार करीत आहेत. | | | | |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी, साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध दिवाणी दावा महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिलांवर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

पनवेल
दि.१२/१२/२०२२

सही/-
**ॲड.वर्षा राजेंद्र पाटील**
**ऑफिस : गाळा नं.०६, पनवेल- दुंदरे रोड, उसर्ली बु.स्टॉप, पो.मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९९२०८१८२०३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी गावठाणामधील व इतर घर मिळकती सिडको तर्फे संपादीत करण्यात आलेल्या असून त्यानुसार सिडको पुनःवर्सन योजनेनुसार भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत. खलीलप्रमाणे वर्णन केलेली नावे असलेली भूखंड मिळकत मालक श्रीमती.अंबुबाई रामदास पाटील ह्या त्यांचा मुलगा आमचे अशिल नामे श्री.रोहित रामदास पाटील यांना बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकती बाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पांतर्गत (वडघर) चिंचपाडा, पुनःर्वसन योजनेतील सर्व्हेक्षणानुसार बांधकाम क्र. T-93 याबाबतची संचिका क्रमांक CHIT-OC-59 मधील पुनःर्वसन योजनेनुसार वाटप केलेल्या भूखंडाचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वाटप**

| भूखंडाचे ठिकाण | सेक्टर क्रमांक | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| वडघर पुष्पक नोड | R 1 | २१३ | १०० |

वरील नमूद भूखंडाचा करारनामा/भाडेपट्टाकरार हा श्रीमती. अंबुभाई रामदास पाटील यांचे नावे दि.३०/११/२०१७ रोजी पवल ४ दस्त क्रं.१३६८६/२०१७ हा नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. वरील नमूद भूखंड क्षेत्र १०० (चौ.मी.) हा क्षेत्राचे मालक श्रीमती.अंबुबाई रामदास पाटील ह्या त्यांचा मुलगा म्हणजे आमचे अशिल नामे श्री.रोहित रामदास पाटील यांना बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर मिळकती बाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचयाकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदार श्रीमती.अंबुबाई रामदास पाटील यांच्या बरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/१२/२०२२

सही/-
**ॲड.अर्चना आ. म्हस्कर**
**ऑफिस : शिवकृपा अपार्टमेंट, सेक्टर-१२, कामोठे, नवी मुंबई, रायगड**

मा.गोडसे सो.कोर्ट

**अर्जदारांतर्फे वकील**
**ॲड.प्रभु यशवंत भोसले**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८४८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०१/२०२३

१) सरला देविदास सोनगिरे
२) कोमल देविदास सोनगिरे
वरील सर्व रा.के.एल.४/२४/०१
सेक्टर ४/ई कळंबोली कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदार क्र.१ व २ हे कै.देविदास मांगो सोनगिरे यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.देवीदास मांगो सोनगिरे हे दि.०९/०९/२०२० रोजी राहत्या घरी के.एल.४/२४/०१ सेक्टर ४/ई कळंबोली कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे मरण पावले. त्यांच्या पश्चात संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| नाव | मिळकतीचे वर्णन | किंमत व क्षेत्रफळ |
|---|---|---|
| देविदास मांगो सोनगिरे | के.एल.४/२४/०१, सेक्टर ४/ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ | ४०,०००/- (चाळीस हजार फक्त) ४६८४.३४७ ३९ मिटर्स चौ.मी. |

सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही कै.देविदास मांगो सोनगिरे यांना वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळविण्यासाठी मे.दिवाणी कोर्टात दिवाणी चौ.अर्ज क्र.१८४८/२०२२ दाखल केला आहे.

सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयाच्या कक्षेत हरकत सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदारांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.१२/१२/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा.गुन्नाल सो

**अर्जदारातर्फे वकील ॲड.आशिष पनवेलकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५६१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/१२/२०२२

कै.रेवा लक्ष्मण वाघेला उर्फ वाघरी उर्फ
रेवाभाई लक्ष्मणभाई वाघेला उर्फ वाघरी (मयत) यांचे वारस
श्री.प्रवीणभाई रेवा उर्फ रेवाभाई वाघेला उर्फ वाघरी
वय : ४० वर्षे, व्यवसाय : बिजनेस
रा.प्लॉट नं.२९, सेक्टर १ ई कळंबोली,
वास्तू वैभव को.ऑप.हौसोसायटी फ्लॅट नं.२०३,
विंग-ए, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.रेवा लक्ष्मण वाघेला उर्फ वाघरी उर्फ रेवाभाई लक्ष्मणभाई वाघेला उर्फ वाघरी यांचे वारस अर्जदार क्र.१ हा त्यांचा मुलगा आहे. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.रेवा लक्ष्मण वाघेला उर्फ वाघरी उर्फ रेवाभाई लक्ष्मणभाई वाघेला उर्फ वाघरी मृत्यू दि.२६/०४/२०२१ रोजी (राहत्या घरी : गाव मु.पोस्ट दुवा तालुका : थराद, जिल्हा : बनासकांठा, राज्य : गुजरात) येथे निधन झाले आहे.

३) कै.रेवा लक्ष्मण वाघेला उर्फ वाघरी उर्फ रेवाभाई लक्ष्मणभाई वाघेला उर्फ वाघरी (मयत) यांचे वारस यांची मिळकत खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन क्र.१**

| गाव | मजला | प्लॉट नं. | फ्लॅट नं. | सेक्टर | बिल्डींगचे नाव | विंग | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड | दुसरा मजला | २९ | २०३ | १ ई | वास्तू वैभव को.ऑप.हौ. सोसायटी | ए | ५४.२ स्क्वे.मीटर |

**मिळकतीचे वर्णन क्र.२**

| ग्रामपंचायत | तालुका | जिल्हा | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| पालेखुर्द | पनवेल | रायगड | ६३ | १ अ | ०-१७-८<br>पो.ख.०-०१-०<br>एकूण ०-१८-८ | ३.६२ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२ माहे १२ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# रस्ता सुरक्षा अर्थात आपलीच सुरक्षा!

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग तसेच जुन्या महामार्गावर वाहन चालकांमध्ये शिस्त निर्माण व्हावी व त्या ठिकाणी होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी होण्याकरिता परिवहन विभागाने सुरक्षा हा उपक्रम दि.०१ डिसेंबर २०२२ पासून पुढील सहा महिन्यांसाठी सुरू केला आहे. दि.०१ ते दि.०७ डिसेंबर २०२२ या कालावधीत वाहतूक नियमांचे भंग करणाऱ्या विशेषतः अतिवेगाने वाहन चालविणे, विना हेल्मेट, विना सिटबेल्ट वाहन चालविणे आणि चुकीच्या मार्गिकेमध्ये वाहन चालविणे, चुकीच्या पध्दतीने मार्गिका बदलणे याबाबत वाहन चालकांमध्ये शिस्त निर्माण करण्याकरिता मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली. याकरिता परिवहन विभागातील ३० अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून दोन्ही महामार्गावर २४ तास ही जनजागृती अंमलबजावणी करण्यात येत आहे.

मुंबई- पुणे या दोन्ही महामार्गावरील होणारे अपघातांमध्ये अतिवेगाने वाहन चालविल्यामुळे झालेल्या अपघातामध्ये मोठया प्रमाणात यापूर्वी जिवीत हानी झालेली आहे. याकरिता अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या वाहनधारकांना पहिले सात दिवस जनजागृती करण्यात आली आहे. यामध्ये कार, जीप ही खाजगी वाहने, ट्रक, टेम्पो, ट्रेलर, टँकर, बसेस ही परिवहन वाहने त्याचप्रमाणे जुन्या महामार्गावर मोटर सायकल या सगळ्या वाहन चालकांनी सुध्दा सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यापुढे सुध्दा या सर्व चालकांची जनजागृती करण्यात येणार आहे. या जनजागृतीमध्ये यापुढे अतिवेगाने वाहन चालविणारे चालक यांनी खालापूर आणि उरसे या टोलनाक्यावर समुपदेशन करण्यासाठी समुपदेशन कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. अशा चालकांना या समुपदेशन केंद्रावर अतिवेगाने वाहन चालविण्याचे दुष्परिणाम याबाबत चित्रफित दाखवण्यात येणार असून त्या चालकांना रस्ता सुरक्षा विषयीची प्रश्नावली सोडवावी लागणार आहे आणि त्यानंतर वाहतूक नियमांचे पालन करण्याची शपथ घ्यावी लागणार आहे. यासाठी एक विशिष्ट सॉफ्टवेअर तयार केले असून त्याचा क्युआर कोड तयार करण्यात आला आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला स्वतःच्या मोबाईलने हा क्युआर कोड स्कॅन केल्यावर प्रश्नावली आणि शपथ मोबाईलवर उपलब्ध होणार असून, प्रश्नावली सोडविल्यानंतर गुणपत्रिका (प्रश्न-उत्तरे)



आणि शपथ घेतल्यानंतर शपथ घेतल्याचे प्रमाणपत्र लगेच उपलब्ध होणार आहे. सर्वोच्य न्यायालयाने गठित केलेल्या रस्ता सुरक्षा समितीने वाहनधारकांना समुपदेशन करावे, अशा सूचना दिलेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

मुंबई-पुणे या दोन्ही महामार्गावरील वाहनांचा वेग हा इतर रस्त्यावरील वेगापेक्ष जास्त असल्याने येथे अपघात झाल्यानंतर सीटबेल्ट न वापरल्यास मोठ्या प्रमाणात जीवित हानी होते, ही बाब विचारात घेऊन सीटबेल्ट बाबत जनजागृती अंतर्गत महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी नेमणूक केलेल्या खठ्ठ या कंपनीचे सहकार्य घेण्यात आले आहे. खालापूर, उरसे, शेडुंग, सोमाटणे, वरसोली येथील प्रत्येक टोलनाक्यावर खखढ्ढ कंपनीचे ३० कर्मचारी आणि परिवहन विभागाचे अधिकारी यांच्यामार्फत टोलनाक्यावर सीटबेल्टबाबत जनजागृती करण्यात आली असून प्रत्येक वाहन चालक व त्यांच्या शेजारी बसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने ते सीटबेल्ट लावले असल्याची खात्री केल्यानंतरच टोल प्लाझाहून त्यांना पुढे प्रवेश देण्यात आला आहे. ही जनजागृती करीत असताना असे दिसून आले की, चालक हे सीटबेल्ट लावत असून त्यांच्याशेजारी बसणाऱ्या व्यक्ती सीटबेल्ट लावत नव्हते, त्यांची मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळालेला आहे. यापुढे प्रवासी बसेसमध्ये सुध्दा प्रवाशांना सिटबेल्ट लावण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. बस उत्पादकाने ज्या बसेसमध्ये प्रवाशांसाठी सीटबेल्टची व्यवस्था केलेली आहे त्या बसेसमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर येण्या-जाण्यासाठी प्रत्येकी तीन मार्गिका आहेत. डावीकडची मार्गिका ही कमी वेगाने जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी असून मधली मार्गिका हलके मोटार वाहन जसे की, कार, जीप या वाहनांसाठी आहे. उजवी मार्गिका ही हलक्या वाहनांना ओव्हरटेकिंगसाठी आहे, असे असताना मोठ्या प्रमाणावर कंटेनर, बसेस ह्या उजव्या मार्गिकेतून धावताना आढळून येतात. त्यामुळे चुकीच्या पध्दतीने मार्गिका बदलणाऱ्या वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली असून वाहनचालकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात शिस्तीचे वातावरण दिसून आले आहे.

या संदर्भात प्रवासी वाहतूक करणाऱ्या काही खाजगी व एसटी बसेस ह्या उजव्या मार्गिकेमधून धावताना आढळून आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर एसटी व खाजगी बसचालकांची जनजागृती होण्यासाठी एसटी महामंडळ यांच्यासोबत बैठक घेण्यात आली असून त्यांनी त्यांच्या चालकांना परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे खाजगी बस वाहतूक संघटना आणि ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट असोसिएशन यांच्याशी सुध्दा बैठक घेण्यात आली असून त्यांच्यास्तरावर सुध्दा चालकांची जनजागृती करण्यात येत आहे. त्यामुळे या संदर्भात संबंधित चालकांकडून आणि त्यांच्या मूळ विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे यापुढे सुध्दा जनजागृती करून समुपदेशन करण्यात येणार आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर काही खाजगी वाहने क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांना घेऊन सीटबेल्ट न लावता, मोबाईलचा वापर करताना अतिवेगाने वाहने चालवितात, असे आढळून आले आहे. अशा धोकादायक वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पुणे, नवी मुंबई, मुंबई, पिंपरी चिंचवड या ठिकाणी कारवाई करण्यात येणार आहे. अशा वाहनांवर बेकायदेशीर प्रवासी वाहतूक केल्याबद्दल दंडात्मक कारवाई करुन वाहन नोंदणी, अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे.

मुंबई- पुणे या महामार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना माहितीकरिता स्थानिक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या यांच्यामार्फत माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दोन्ही महामार्गावर ही मोहीम सुरु असल्याबाबतचे १०० फलक लावण्यात आलेले आहेत. सोशल मिडिया मधून सुध्दा यास प्रसिध्दी देण्यात येत आहे.

वाहनचालकांनी सुरक्षा अभिनयास सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे जुन्या महामार्गावर गेल्या सात दिवसात एकही अप-घात घडलेला दिसून आला नाही. त्यामुळे त्या ठिकाणी वाहन चालकांमध्ये शिस्तीचे पालन करण्यासाठी मुख्य:त्वे हेल्मेट व अवैध पार्किंगबाबत यापुढेही जनजागृती करण्यात येणार आहे.

लोणावळा येथून मुंबईकडे येणारा खालापूर टोल नाक्यापर्यंत रस्ता हा उताराचा असल्यामुळे खूप मोठया प्रमाणात ट्रक, टँकर, ट्रेलर अशा मालवाहू वाहनांचे मोठया प्रमाणावर अपघात यापूर्वी झालेले आहेत. या ठिकाणी उताराचा रस्ता असून सुध्दा इंधन वाचविण्यासाठी न्युट्रल गिअरचा वापर करुन त्या ठिकाणी अनेक वाहनचालक वाहन चालविताना आढळून आले आहेत. ही गैरसमजूत दूर करण्याच्या हेतूने त्यांचे समुपदेशन करण्यासाठी व त्या १५ किलोमीटरच्या अंतरात एक विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली असून वाहन चालकांना न्युट्रल गिअरचा वापर न करणे त्याचप्रमाणे वेगावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने पहिल्या किंवा दुसऱ्या गिअरचा वापर करण्याबाबत समुपदेशन करण्यात येत आहे. या ठिकाणी वाहन चालकांचे अधिक तांत्रिक पध्दतीने प्रबोधन करण्यासाठी उत्पादक कंपन्यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. यास वाहन चालकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून ही जनजागृती यापुढेही सुरू राहणार आहे.

मुंबई-पुणे महामार्गावर प्रवास करणाऱ्या सर्व वाहनचालकांनी परिवहन विभागाने सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमास नियमांचे काटेकोर पालन करुन सकारात्मक प्रतिसाद द्यावा व रस्त्यावर सर्वांची सुरक्षा निर्माण करण्याकरिता सहकार्य करावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण महेश देवकाते यांनी केले आहे.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

---


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिस द्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. पांडुरंग भीमा होडगे हे श्री. राजेंद्र एकनाथ गंभीरे यांचेकडून खालील वर्णनाचा फ्लॅट खरेदी करत आहेत. सदर व्यवहारापोटी काही रक्कम त्यांना बयाणा म्हणून दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :**
**मौजे - उसर्ली खुर्द, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड. सर्वे नं. १३३, फ्लॅट नं. १०४,बी विंग, १ ला मजला, एकूण क्षेत्र ५४६ स्क्वे. फूट कारपेट एरिया म्हणजेच ५०.७४ स्क्वे. मी. कारपेट एरिया, सोबत ४६ स्क्वे. फूट टेरेस / गार्डन मेंशन बॅलेन्स (कारपेट), बिल्डिंग - निम्बेश्वर भूमी.**

वरील वर्णनाचा फ्लॅट आमचे अशील खरेदी करत आहेत. सदर फ्लॅट मध्ये कुणाचेही हक्क, वहिवाट, गहाणखत, खरेदीखत, दानखत, बक्षीसपत्र अन्य हितसंबंध असेल त्यांनी सदर जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत खाली सही करणार डव्होकेट यांचेकडे नोंदवावी.

सदर हरकत नमूद मुदतीत न घेतल्यास कुणाचेही हक्क हितसंबंध अधिकार या फ्लॅट मध्ये नाही असे समजून खरेदीखत व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी. हे या नोटिस द्वारे कळविण्यात येत आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/१२/२०२२

सही/-
**ॲड. कुंडलिक काशीनाथ मोहिते**
**(बी.एल.एस.,एल.एल.बी.)**
**कार्यालयीन पत्ता-श्री अंजनी कॉम्प्लेक्स, बी विंग, फ्लॅट नं.३०१, तिसरा मजला शिलोत्तर रायचूर, सुकापुर, पनवेल, जि-रायगड-४१०२०६**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे अशिलाने प्रस्ताविक जमीन मालक १) रजनी शशिकांत अध्यापक, २) सुगंधा सुरेश शहाणे, ३) धिरेंद्र माधव आगटे, ४) बळवंत वसंत खेर, ५) मकरंद वसंत खेर, ६) पद्मा राजाराम देसाई, ७) वृंदा वसंत खेर व कुळ १) कमळा रामदास खुटले, २) जनाबाई बाळकृष्ण गायकर, ३) दत्तत्रेय गोपाळ खुटले, ४) नामदेव गोपाळ खुटले, ५) मधुकर रामदास खुटले, ६) अनिल धर्मा खुटले, ७) वंदना गोमाजी मढवी, ८) सुवर्णा धर्मा खुटले, ९) भारती नंदकुमार हुद्दार, १०) प्रवीण धर्मा खुटले, ११) विजय धर्मा खुटले, १२) चंद्रकांत पांडुरंग फडके, १३) विशाल पांडुरंग फडके या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | भूमापन नं./ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| नांदगाव | २९/२ | ०-२५-८०<br>पो.ख.०-०९-९०<br>एकूण ०-३५-७० | ७.९६ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/१२/२०२२

सही/-
**ॲड.श्री.दिपक आर.शेळके**
**डी-३/१, किनारा हौ.सो., बावन बंगलो, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**


# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीत विज्ञान गणित प्रदर्शन आयोजन

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

म.ए.सो.ज्ञानमंदिर ,कळंबोली विद्यालयात माध्यमिक विभागाचे शैक्षणिक वर्ष २०२२- २३ मधील विज्ञान गणित प्रदर्शन शनिवार दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी भरविण्यात आले होते.

या प्रदर्शनात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी गटानुसार एकूण ३९ विज्ञान आणि गणित प्रतिकृती आणि प्रकल्प मांडले होते. यात एकूण ८५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

' तंत्रज्ञान आणि खेळणी'या मुख्य विषयावर आधारित विद्यार्थ्यांनी प्रतिकृती आणि प्रकल्प बनविलेले होते. यामध्ये रोबोट, होलोग्राम, लाव्हा लॅम्प,पेरिस्कोप,कॅलिडीओस्कोप, सोलर सिस्टिम मॉडेल, रूम हीटर,न्यूटन्स डिस्क, किडनी फंक्शनिंग मॉडेल, डीप वेल, इमेजेस फॉर्म्ड बाय टू मिरर्स, ज्वालामुखी प्रतिकृती,पवन ऊर्जेपासून विद्युत निर्मिती.... इत्यादी विज्ञानावर आधारित वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आणि प्रतिकृती मांडण्यात आलेल्या होत्या.

गणितावर आधारित multiplication calculator, additive inverse model,DIY clock model, ची किंमत काढणे, Square root of numbers model,Working model for types of numbers इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण प्रतिकृती विद्यार्थ्यांनी मांडल्या होत्या. इयत्तावार दोन क्रमांक काढण्यात आले. हे विज्ञान गणित प्रदर्शन अतिशय उत्कृष्टपणे पार पडले.




मा.गोडसे सो.

**अर्जदारांकरिता ॲडव्होकेट ॲड.उदय प्र.मोकल**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६९९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/०२/२०२३

(कै.जगन्नाथ गोपाळराव शिंदे यांचे कायदेशीर वारस)
१) कुमारी.श्रीशा जगन्नाथ शिंदे (मुलगी)
वय : २१ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्रीमती.सुषमा जगन्नाथ शिंदे (पत्नी)
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कुमार.आराध्य जगन्नाथ शिंदे (मुलगा)
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
तर्फे अज्ञान पालनकर्ती आई
श्रीमती.सुषमा जगन्नाथ शिंदे
१ ते ३ रा.रुम नं.बी/१:४, बिल्डींग नं.सी/३,
सुर्योदय को.ऑप.हौ.सो., खांदा कॉलनी,
सेक्टर नं.८, नवीन पनवेल (पश्रिम), पनवेल-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.जगन्नाथ गोपाळराव शिंदे यांचे दि.०३/०७/२०२० रोजी वाशी नवी मुंबई येथील हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटलमध्ये झालेले आहे. कै. जगन्नाथ गोपाळराव शिंदे यांच्या मृत्यूपश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. जगन्नाथ गोपाळराव शिंदे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.जगन्नाथ गोपाळराव शिंदे यांनी खांदा कॉलनी, पनवेल, जि.रायगड येथे खालील फ्लॅट खरेदी केलेला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड**
**निवासी सदनिका क्रं. : B/1:4**
**बिल्डींग नं. : C-3**
**सुर्योदय को.ऑप.हौ.सो.लि., सेक्टर-८,**
**क्षेत्रफळ : ३६.०० स्क्वे.मी.**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचा वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.जगन्नाथ गोपाळराव शिंदे अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीरनोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०७/१२/२०२२

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.व.स्तर, पनवेल | | दि.न्या.व.स्तर, पनवेल |



## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२४३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०१/२०२३

सौ.उज्वला गणेश म्हात्रे व इतर अर्जदार
विरुद्ध
श्री.विकास वामन ठाकूर व इतर सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.नामुबाई सिताराम ठाकूर रा.मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे अल्पशा आजाराने दि.३०/०३/२००३ रोजी राहत्या घरी जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच कै. पुष्पलता महेश म्हात्रे यांचे निधन दि.२९/०१/२००० रोजी मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. अर्जदार क्र.१) सौ.उज्वला गणेश म्हात्रे रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड २) सौ.दिप्ती किशोर कांबळे रा.केगाव, ता.उरण, जि.रायगड ३) सौ. कामिनी निलेश घरत रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड ४) सौ.विशाखा महेश लायगुडे रा.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड ५) सौ.मेघा महेश म्हात्रे रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| २५३/जसखार | ७८ | ४ | ०-१५-०९ |
| | ४१ | ८ | ०-०५-०३ |
| | ४२ | २ | ०-०५-०३ |
| | ४७ | १६ | ०-०२-०८ |
| | ५९ | ७ | ०-०६-०८ |
| | २० | २ | ०-०७-०८ |
| | ३२ | ४ | ०-०७-०८ |
| | ६४ | ३ Part | ०-१२-०४ |
| | ७९ | २ ब | ०-०२-०८ |
| | ८० | ८ | ०-१२-० |
| | ८९ | १२ | ०-०६-० |
| | १०० | २८ | ०-०३-०५ |
| | ११० | १२ Part | ०-०६-० |
| | ११३ | ८ | ०-०६-०७ |
| | १२० | २ | ०-०३-० |
| | १२६ | १६ | ०-०४-०३ |
| | १२७ | ८ | ०-०७-० |
| | १४३ | २ | ०-०९-०५ |
| | १४७ | ६ | ०-०५-०३ |
| | १३८ | २ | ०-०६-०९ |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

उरण
दि.०८/१२/२०२२

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.क.स्तर, उरण | | दि.न्या.क.स्तर, उरण |


# महिलेच्या सॅक मधून सोन्याचे दागिने केले लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिपाली पाटील ( वय २७ ) यांच्या ताब्यातील सॅक मधून जवळपास २१ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीचा इराद्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


Hon'ble Godase Madam

**Adv.Daramyansingh Bist**
**Advocate For Applicants**

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE 2ND CIVIL JUDGE SENIOR DIVISION AT PANVEL DISTRICT RAIGAD
CIVIL MISC.APPLICATION No. 1787 / 2022
Exh.7/D
Next Date - 23/01/2023

**1. Mrs. Sangeeta Vishnu Shankar Tiwari**
Resident of- at 6/302, Tulsivihar CHS ltd
Tatwagyan Vidyapeeth, Ghodbunder Road
Kapurbawdi, Apna Bazar, Thane (West)
**2. Mrs. Sunita Anil Sharma**
Flat No.301, Queens Regency,
Queen Park Behind Deepak Hospital,
Mira Road (East), Dist; - Thane
**3. Smt. Anita Mahendra Rai**
Flat No.501, B wing, Shubhchintak Heights,
Indralok Phase-3, Near Shalom Hospital,
Bhyander (East), Dist: Thane …Applicants
Versus
**Smt. Seema Ashish Sharma**
Resident of Residing Room No.3,
Padit Sharma Chael, LBS marg
Pratap Nagar, Near BPES School,
Bhandup (west), Mumbai 400078 … Opponent

Whereas the Applicants above named have filed the present Application for the grant of Heirship Certificate in respect of immovable property more particularly described in the scheduled hereinunder. The said immovable property was left behind by the deceased late. Mr. Jagjit Vasudev Sharma, expired on 08.02.2014 at Mumbai due to natural death.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that piece and Parcel of the Property i.e., Shop No.4, on Ground Floor, in "Om Heritage" in the society known as Shree Sadguru Co-op Housing Society Ltd lying and situated on the plot of land bearing Plot No.36 in, Sector-21, at Kharghar, Navi Mumbai and bearing Share Certificate No.8 and distinctive No.36 to 40 of Shree Sadguru Co-op Housing Society Ltd and letter of allotment has been issued by the society and also grant to transfer bearing No. CIDCO/EMS/AEO(HQ)/2005/2709 dated 24.08.2005 issued by the CIDCO corporation in the name of deceased Shri. Jagjit Vasudev Sharma.

The property is valued for Rs.35,00,000/- (Rupees Thirty-Five Lakh Only)

And whereas if any person/s is/are having any right, title, interest and/or benefit etc., in the said immovable property mentioned in the scheduled hereinunder, is/are hereby invited to submit his/her/their objection in this court within a period of 30 days from a date of proclamation of this Public Notice.

As such, if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of publication of this Public Notice, the Application of Applicants shall be allowed and the Heirship Certificate as prayed for shall be granted

Given my hands and Seal of this court on this 9th December,2022

| Sd/- | | Sd/- |
|---|---|---|
| Judicial Clerk | Court Seal | Asst.Superitent. |
| Senior Division | | Senior Division |
| Panvel | | Panvel |

# संक्षिप्त...

## उघड्यावर बिर्याणी विक्री करण्यावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कारंजाडे वडघर रोड वर कॉलेज फाटा येथील फुटपाथ वर बेकायदेशीर उघड्यावर बिर्याणी विक्री करण्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे .

मोहम्मद साबेरूल मंजूर आलम ( वय ३६ ) याने चिकन बिर्याणी विक्रीसाठी फुटपाथवर टेबल लावून त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून ज्वालाग्राही साहित्याचा हयगयीने वापर करून मानवी जीवास धोका निर्माण केल्याचे मिळून आल्याने त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे .

## मोटारसायकलींची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन येथील डाव्या बाजूच्या पार्किंगच्या बाहेर रस्त्याच्या बाजूस उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे .

भूषण तरे ( वय ३१ ) रा. उसर्ली यांनी त्याची २० हजार रुपये किमतीची निळ्या रंगाची पल्सर मोटार सायकल क्रमांक एमएच ०२ डी एल -५३०५ ही पनवेल रेल्वे स्टेशन येथील डाव्या बाजूच्या पार्किंगच्या बाहेर रस्ताच्या बाजूस उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## प्रतीक्षा पिंगळे राष्ट्रीय हँडबॉल चॅम्पियनशिप मध्ये महाराष्ट्र संघात निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्जत-कशेळे येथील ऑर्चिड ग्लोबल स्कूल ऑफ अकॅडमीक अँड स्पोर्ट्स येथील प्रतीक्षा राजेंद्र पिंगळे हीची १४ ते १८ डिसेंबर दरम्यान बिहार येथे ३७ वी सब ज्युनिअर मुलींची राष्ट्रीय हँडबॉल चॅम्पियनशिप मध्ये महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे. तर राष्ट्रीय प्रशिक्षक-क्रीडा शिक्षक देव समाधान सिलका याची महाराष्ट्र संघ प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या निवडी बद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# माथेरानमध्ये धनाढयांच्या बंगल्यातील जंगलतोडीकडे वनखात्याचा कानाडोळा

**दै.रायगड नगरी । माथेरान**



हिरवेगार, शांत आणि थंड हवेचे माथेरान अशी ओळख असलेल्या या सुंदर पर्यटनस्थळाची ही बिरुदावली संपुष्टात आणण्यासाठी काही धनाढयांच्या माध्यमातून मागील काही वर्षांपासून प्रयत्न सुरू असून काहींनी जुने बंगले विकत घेऊन त्याजागी आलिशान हॉटेल्सची बांधकामे करताना बंगल्याच्या आवारातील संपूर्ण वनराई जमीनदोस्त केल्याचे निदर्शनास येत आहे परंतु याकडे वनखात्याने हेतुपुरस्सर कानाडोळा केल्याने अशा धनाढयांना झाडांची बेसुमार कत्तल करण्यासाठी वाटा मोकळ्या झालेल्या आहेत.

येथील डंपिंग ग्राऊंडकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सेट व्हीला हा बंगला असून या बंगल्याच्या आवारातील जवळपास सर्वच झाडी जमीनदोस्त केल्याचे दिसून येत आहे. हा बंगला एकेकाळी आजूबाजूला असणाऱ्या गर्द झाडीमुळे दृष्टीस येत नव्हता तो आता स्पष्टपणे दिसत आहे एवढी मोठया प्रमाणावर या बंगला धारकाने झाडी नष्ट केली आहे. वनखात्याला याबाबत अनेकदा नागरिकांकडून सूचित करण्यात आले होते परंतु अशा धनाढयांना जंगलतोड करण्यासाठी मुभा दिली आहे की काय असाही प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे. तर याच बंगले धारकांच्या मालकीच्या मुख्य रस्त्यालगत असणाऱ्या बंगल्याचे नव्याने नूतनीकरण करण्यात आले असून सर्व डेब्रिज रस्त्याच्या बाजूला टाकण्यात आले आहे त्यामुळे पर्यावरणाला बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकीकडे दरवर्षी पावसाळ्यात मोठया प्रमाणावर वृक्षारोपण केले जाते त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च केला जात असून दुसरीकडे अशाप्रकारे धनाढयांना जंगलतोड करण्यासाठी मोकळीक दिली जात आहे. सेट व्हीला या बंगल्यात आतापर्यंत जी काही वृक्षतोड झाली आहे.त्याबाबत वनखात्याकडे वृक्षांची नोंद आहे की नाही असेही बोलले जात आहे.अनेक धनाढयांनी दोन दशकांपासून याठिकाणी जुने बंगले विकत घेऊन त्याठिकाणी थ्री स्टार हॉटेल्स उभारली आहेत तर काही हॉटेल धारकांनी मुख्य रस्त्यालगत असणाऱ्या वनखात्याच्या जागेवर अतिक्रमण करून ती जागा काही राजकीय पक्षांच्या आशीर्वादामुळेच व्यापलेली आहे.मर्यादे पेक्षाही भरमसाठ रूम्स बांधलेले आहेत.एकंदरीत वनखात्याच्या भोंगळ कारभारामुळे इथली वनसंपदा लोप पावत चालली आहे. अशीच परिस्थिती पुढेही सुरूच राहिली तर माथेरान हे पर्यटनस्थळ उजाड व्हायला वेळ लागणार नाही.

**संयुक्त वनव्यवस्थापन समिती मार्फत २०२० मध्ये जून महिन्यात सेट व्हीला या बंगल्यात तत्कालीन वन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत सर्व्हे करण्यात आला होता.त्यावेळी पूर्वीच्या सर्व्हे पेक्षा काही प्रमाणात झाडे कमी झाल्याचे आढळून आले. परंतु राजकीय हस्तक्षेपामूळे वन विभागाला मर्यादा निर्माण झाल्या आहेत.**

**योगेश जाधव -- अध्यक्ष संयुक्त वनव्यवस्थापन समिती माथेरान**

# शेतकऱ्यांचे भात हमी भावाने घ्यावे भाजप किसान मोर्चाची मागणी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

शेतकऱ्यांचे भात हमी भावाने घेतलेच पाहिजे अशी मागणी निवेदनाव्दारे भाजप किसान मोर्चाच्यावतीने तहसील कार्यालयात करण्यात आली आहे

कर्जत तालुक्यात शासनाची हमी भावाने भात खरेदी केंद्रे सुरु झाली आहेत. परंतु केंद्रावर शेतकरी भात घेऊन गेले असता ई पिकपाणी नोंद झाली असेल तरच भात खरेदी केले जाईल असे सांगितले जाते. अनेक शेतकरी अशिक्षित असल्याने त्यांना ई नोंद घालायला जमले नाही तर ग्रामीण भागात मोबाईल नेटवर्क नसल्याने काही लोकांची नोंद झाली नाही. त्यामुळे आडलेले शेतकरी जावुन स्वस्तात व्यापाऱ्यांना भात विकावे लागत आहे.

आधीच अवकाळी पाऊस करोना मुळे शेतकरी पिचला आहे. म्हणून आज दि.१२ डिसेंबर रोजी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे कोकण संपर्क सुनील गोगटे, तालुका अध्यक्ष शिरीष कदम, माजी तालुका उपाध्यक्ष रमेश अहिर सूर्यकांत गुप्ता, हरिश्चंद्र मांडे, मालुसरे यांनी कर्जत तहसीलदार डॉ. शितल रसाळ यांची भेट घेवून त्यांना निवेदन दिले, व सरसकट शेतकऱ्यांचे भात आधारकार्ड आणि सातबारा घेऊन हमी भावाने खरेदी करावे अशी विनंती केली.

त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत भात खरेदी करण्याच्या सूचना देण्यात येतील असे सांगितले.

# १०० दिव्यांगांना मिळाले कानाचे मशीन ; मुखबधिरांना दिला मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । रोहा**

दिव्यांगांना प्रेरणा मिळावी म्हणून जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधत हेल्पर्स ऑफ दी हॅण्डीकॅप तर्फे दिव्यांगांना कानाचे मशीन वितरित करण्याचे आयोजन रोहा शासकीय विश्राम गृहात करण्यात आले होते. रोह्यात अपंग पुनर्वसन संस्थेचे काम करणाऱ्या रोशन अमोल देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यानी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी १०० दिव्यांगांना कानाचे मशीन उपलब्ध करून देण्यात आले.

अपंग पुनर्वसन संस्थेच्या रोशन अमोल देशमुख यांच्या प्रयत्नांतुन हेल्पर्स ऑफ दी हॅण्डीकॅप, युवक प्रतिष्ठाण आणि लायन्स क्लबच्या सहभागातून या सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रोहा बाळासाहेबांची शिवसेना तालुका प्रमुख ड.मनोजकुमार शिंदे, मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, रोहा सिटीझन फोरमचे निमंत्रक प्रदीप आप्पा देशमुख, भाजपा शहर अध्यक्ष शैलेश रावकर, लायन्स क्लबचे मिलन शाह, शशिकांत मोरे, रोशन अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, अमोल देशमुख, समिधा अष्टीवकर आदींसह रायगड जिल्ह्यातील दिव्यांग सदस्य उपस्थीत होते. या कार्यक्रमासाठी भाजपाचे नेते नील सोमय्या व किरीट सोमय्या यांनी १०० कर्णबधीर लोकांना शंभर कानाच्या मशीन दिल्या. या कार्यक्रमात ज्या दिव्यांगांनी परिस्थितीवर मात करत शिक्षण, कला व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली अश्या दिव्यांगांचे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कोरोना काळात दिव्यांगांना रोहा तालुक्यातील विविध संस्था, लायन्स क्लब ऑफ रोहा, उपजिल्हा रुग्णालय रोहा, सुदर्शन केमिकल रोहा, पंचायत समिती रोहा, रोहा अष्टमी नगरपरिषद, तालुका वैद्यकीय विभाग या विभागातील अधिकाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. जागतिक अपंग दिवसाचे औचित्य साधून रायगड मध्ये दिव्यांगांना प्रेरणा मिळावी म्हणून व त्यांचे पुनवर्सन व्हावे यासाठी नेहमीच हेल्पर्स ऑफ दी हॅण्डीकॅप ही संस्था प्रयत्नशील असते. रायगड जिल्ह्यातील अपंगावर मात करण्यासाठी सोहम देशमुख यांनी शस्त्रक्रीया केली व चांगल्या पध्दतीचा प्रतिसाद दिल्याने अश्या सोहम देशामुखचा आदर्श इतरांनी घेऊन आपण चांगले होण्याचा प्रयत्न करू हाच हेतू आहे. अपंगावर मात करत सतीश सहदेव भोईर याने बी. ए. बीएड शिक्षण घेतले त्याचा सन्मान करण्यात आला.

# तळा तालुक्यातील स्वदेस स्वप्नातील गाव वावे हवेली येथे कृषी विभागाची भेट

**दै.रायगड नगरी । तळा**



जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले, कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर व उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांच्यासोबत जिल्ह्यातील १५ तालुका कृषी अधिकारी मंडळ कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक यांनी स्वदेस फाउंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आलेल्या तळा तालुक्यातील वावे हवेली या स्वप्नातील गावांना भेट दिली.

गावातील पायाभूत सुविधा, सामाजिक विकास, आर्थिक विकास व गावाची एकजूट दिसून आली. स्वदेस फाउंडेशन यांच्यामार्फत गावात स्थापन केलेल्या विकास समिती व ग्रामस्थ यांनी स्वच्छ, सुंदर, आत्मनिर्भर व सक्षम विकास समिती विकास समिती यांची विकासाकडे वाटचाल दिसून आली.

स्वदेस फाउंडेशन व शासन एकत्र येऊन व ग्रामस्थ यांच्या मदतीने विकासाची वाटचाल नक्कीच होईलअशी अपेक्षा ठेवून गावाची वाटचाल सुरू आहे.उपसंचालक तुषार इनामदार यांनी स्वदेस फाउंडेशन च्या उपक्रमांची माहिती कृषी अधिकाऱ्यांना करून दिली.

तसेच स्वदेस टीम सोबत कृषीअधिकाऱ्यांची चर्चा झाली. गाव विकास समितीने झालेल्या विकास कामाचे सादरीकरण केले, गावाने सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी उद्दिष्टे पूर्ण करत आरोग्य, शिक्षण, उपजीविका, शेती, कौशल्य विकास व पायाभूत सुविधा यांची स्वदेस फाउंडेशन च्या माध्यमातून स्वप्नातील गाव घडवले आहे, गावामध्ये गावकऱ्यांच्या माध्यमातून झालेल्या विकास कामांची अधिकाऱ्यांनी पाहणी केली व अधिकारी भारावून गेले.

गाव विकास समिती वावे हवेली यांनी स्वप्नातील गाव ची संकल्पना, केलेले नियोजन, गाव विकास आराखडा, त्यानुसार नियोजित वेळेत पूर्ण केलेली कामे यांचे उत्तम पद्धतीने सादरीकरण करण्यात आले, तसेच शेती आणि शेती पूरक व्यवसायातून केलेली प्रगती आणि पुढे करावयाची कामे आणि जबाबदारी पाहून सर्व अधिकारी वर्गाने गाव विकास समिती चे कौतुक केले, त्याचप्रमाणे गाव फिरताना जी कामे झाली आहेत ती सर्व रायगड मधील गावागावात कशी केली जातील यासाठी सर्वांना प्रोत्साहन दिले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले, कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर, कृषी उपविभागीय अधिकारी कैलास वानखेडे व जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी आणि कृषी सहाय्यक तसेच स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार, महाव्यवस्थापक प्रसाद पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक नजिर शिकलगार, विकास खरमाळे, माणगाव तालुका कृषी अधिकारी एन.वाय.घरत, माणगाव व तळा मंडळ कृषी अधिकारी सागर वाडकर, कृषी सहाय्यक मधुकर शेंडे व योगेश कोळी, आत्मा तालुका व्यवस्थापक प्रमोद शिंदे, शिवतेज ढऊल, भीमराव भालेराव, रवींद्र राऊत, प्रदीप चिनके, मिलिंद आढाव, निनाद दर्गे, समन्वयक राकेश पाखुर्डे, लहू दोलताडे, चांगदेव सानप, सरपंच ग्रामपंचायत सोनसडे सौ.माधुरी पारावे, व गाव विकास समिती निवी व वावे हवेली, शेतकरी बांधव, ग्रामस्थ महिला व पुरुष उपस्थित होते.

# करंजाडेमध्ये महाविकास आघाडीच्या प्रचाराचा धडाका

## रामेश्वर आंग्रे यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंजाडे ग्रामपंचायतीमध्ये विद्यमान सरपंच रामेश्वर बबन आंग्रे हे पुन्हा एकदा थेट सरपंच पदाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. महाविकास आघाडीतर्फे तर्फे करंजाडे येथे शेकाप, ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित व बहुजन आघाडी अशा मित्र पक्षांच्या महाविकास आघाडीने प्रचार फेरीचे आयोजन केले होते. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रचंड उत्साह या प्रचार फेरीमध्ये दिसून आला.

यावेळी शेकाप पनवेल शहर जिल्हा चिटणीस गणेश चंद्रकांत कडू, महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्षा अनुराधा ठोकळ आदींच्या प्रमुख उपस्थित प्रचार फेरीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थियांना संबोधित करताना गणेश कडू म्हणाले की रामेश्वर आंग्रे आणि त्यांच्या सर्वच सदस्यांनी भरभरून विकास कामे केली आहेत. आपल्या कार्यकालाच्या अखेरच्या दिवसापर्यंत अगदी विरोधकांची सुद्धा विकास कामे त्यांनी केली आहेत. त्यामुळे आम्ही केलेल्या विकास कामांच्या जोरावर आमचे सगळे सदस्य आणि रामेश्वर आंग्रे भरघोस मतांनी निवडून येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नुकत्याच झालेल्या पनवेल अर्बन को-ऑपरेटिव्ह निवडणुकीमध्ये बँकेवर आर्थिक ताण येऊ नये या प्रामाणिक उद्देशाने आम्ही भारतीय जनता पार्टीकडे निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. जनभावनेचा आदर न



करता विरोधकांनी बँकेच्या माथी ही निवडणूक मारली. महाविकास आघाडीला मतदारांनी भरभरून मतदान केले आणि विरोधकांच्या चारी मुंड्या चित करत त्यांना आम्ही आस्मान दाखवले. येणार्या काळात आगामी सगळ्या निवडणुकांच्यात हेच चित्र पाहायला मिळेल, असा विश्वास माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटतो. रामेश्वर आंग्रे आणि त्यांच्या तमाम सदस्यांना मी विजयी होण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो, असे ते म्हणाले.

महाविकास आघाडीचा विजय असो!! रामेश्वर आंग्रे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है! अशा घोषणांनी करंजाडेचा परिसर दुमदुमून गेला होता. शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित आणि बहुजन आघाडी आशा मित्र पक्षांच्या महाविकास आघाडीचे कार्यकर्ते झेंडे, मफलर, होर्डिंग घेऊन मोठ्या संख्येने प्रचार फेरीमध्ये सहभागी झाले होते. विशेष म्हणजे माता भगिनींच्या रूपात महिला शक्ती मोठ्या प्रमाणामध्ये रस्त्यावरती उतरून महाविकास आघाडीचा प्रचार करताना दिसून येत होती. ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग देखील विलक्षण होता. एकंदरीतच समाजातील विविध गटातील, विविध धर्मातील नागरिक उत्स्फूर्तपणे महाविकास आघाडीच्या प्रचार फेरीमध्ये सहभागी झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते.


### जाहीर लिलावाची नोटीस

तमाम जनतेस सदरील नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली चल मिळकत ग्रुप ग्रामपंचायत साई, ता.पनवेल, जि.रायगड यांनी येणे असलेल्या कराबाबतच्य रक्कमेसंबंधात कायदेशीर तरतुदींचे अनुपालन करून जप्त केलेली आहे. सदर चल मिळकत जशी आहे व ज्या परिस्थितीत आहे तशी ती दि.२७/१२/२०२२ रोजी जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन | मालमत्तचे ठिकाणी |
|---|---|---|
| १ | Kalmar RTGC RTGC S. No.40821 | Arshiya FTWZ, Sai Panvel |
| २ | Kalmar RTGC RTGC S. No.40822 | Arshiya FTWZ, Sai Panvel |

लिलावाची तारीख, टाईम तारीख :- २७/१२/२०२२
वेळ ११.०० सकाळी ते ४.०० दुपारी
ग्रुप ग्रामपंचायत साई कार्यालयासमोर, साई, ता.पनवेल, जि.रायगड

विक्रीच्या शर्ती

१) दरवेळी बोली किती रकमेने वाढवावयाची हे विक्रीने कामकाज पाहणारा अधिकारी ठरविल. बोलीच्या रकमेबाबत किंवा बोलीदराबाबत कोणताही वादनिर्माण झाला तर वरील नमूद मिळकत ताबडतोब पुन्हा लिलावासाठी मांडली जाईल.

२) सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास त्यावरील नमूद मिळकतीचा खरेदीदार म्हणून घोषित केला जाईल. मात्र तो बोलीदार बोली बोलण्यास कायदेशीरपणे पात्र असला पाहिजे आणि तसेच सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली किंमत अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून आल्यास ती बोली नाकारणे इष्ट ठरेल असे विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यास वाटल्यास असा अधिकारी स्वविवेकानुसार ती बोली स्वीकारण्यास नकार देवू शकेल.

३) विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी, स्वविवेकानुसार आणि कारण नमूद करून विक्री तहकूब करू शकेल.

४) चल मालमत्तेच्या बाबतीत, ज्या व्यक्तीस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, त्या व्यक्तीने तशी घोषणा केल्यानंतर ताबडतोब, खरेदी किंमतीच्या ५० टक्के एवढी रक्कम, विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून भरली पाहिजे. अशा रितीने रक्कम भरण्यास कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करून विकली जाईल.

५) वरील नमूद मिळकतीचे खरेदीखता वेळी खरेदीची संपूर्ण रक्कम देण्याची आहे. तसेच विक्री अधिकाऱ्यास योग्य वाटल्यास विक्री अधिकाऱ्याने दिलेल्या मुदतीत सदरची रक्कम देणेची आहे आणि अशी किंमत भरण्यात कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करून विकली जाईल.

६) खरेदी किंमतीच्या उर्वरित रक्कम नेमून दिलेल्या मुदतीच्या आत भरण्यात कसूर झाल्यास, विक्रीची नवीन अधिसूचना काढून त्या मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल. अशा प्रसंगी अनामत रकमेमधून विक्रीचा खर्च भागविल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहिल ती रक्कम नेमलेल्या अधिकाऱ्याला उचित वाटल्यास, किंवा ती मालमत्ता मागाहून जितक्या रकमेस विकली जाईल त्या रकमेपैकी कोणत्याही भागासंबंधीच्या सर्व हक्क मागण्या नाहीशा होतील.

७) चल मालमत्तेच्या बाबतीत, बोली बोलणाऱ्या व्यक्तीस १,००,०००/- (एक लाख) एवढी रक्कम, विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्या अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच अनामत रक्कम ''रोख किंवा डिमांड ड्राफ्ट'' द्वारे स्वीकारली जाईल.

आज तारीख १२ माहे डिसेंबर २०२२ रोजी सरपंच व उपसरपंच ग्रुपग्रामपंचायत, साई, ता.पनवेल, जि.रायगड सहीनिशी व शिक्क्यानिशी दिले.